# पात्रता व निकष

१) नाशिक महानगरपालिकेच्या शहर पथविक्रेता समिती निवडणूक लढविण्याकरिता उमेदवाराची पात्रता खालीलप्रमाणे असेल.

उमेदवाराचे नाव पथ विक्रेत्यांच्या अंतिम मतदार यादीमध्ये असणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र / फेरीवाला नोंदणी फि र.रु. ३००/- ची मुळ पावती असणे आवश्यक आहे.

- उमेदवाराच्या नावे नाशिक महानगरपालिकेकडील मिळकत कर, पाणीपट्टी थकबाकी ना-हरकत दाखला/ राष्ट्रीय फेरीवाला धोरण विभागाकडील दैनंदिन शुल्क् थकबाकी ना-हरकत दाखला असणे आवश्यक आहे.
- उमेदवार आरक्षित संवर्गातून निवडणूक लढवीत असल्यास त्याच्याकडे त्या संवर्गातील जातीचा दाखला व जात पडताळणी, विकलांग/दिव्यांग दाखला, अल्पसंख्यांक दाखला / प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- उमेदवाराने नगर विकास विभाग यांचे असाधारण क्रमांक ११६ बुधवार, ऑगस्ट ३, २०१६ च्या राजपत्रातील अर्जासोबत नमूद घोषणापत्र दाखल करणे आवश्यक आहे.
- उमेदवाराच्या पात्रतेबाबत इतर कोणताही मुद्दा उपस्थित झाल्यास सार्वत्रिक निवडणूकमध्ये नमूद असलेले नियम लागू होतील. तसेच महाराष्ट्र शासन भाग चार-अ मधील मुद्दा क्र. १६ (२) मध्ये पथ विक्रेत्यास जर तो : (एक) नैतिक अध:पाताचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधासाठी सिद्धदोषी असेल किंवा (दोन) नगर पथ विक्रेता समितीचा सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये पार पाडण्याकरिता शारिरीकदृष्ट्या किंवा मानसिकदृष्ट्या अक्षम असेल, तर नगर पथ विक्रेता समितीमध्ये निवडून येण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

२) नामनिर्देशन पत्र विनामूल्य पुरविण्यात येईल. अंतिम मतदार यादी राष्ट्रीय फेरीवाला धोरण विभाग, मुख्यालय, राजीव गांधी भवन, नाशिक कार्यालयांत उपलब्ध आहे. तसेच महानगरपालिकेच्या www.nmc.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध आहे.

३) नामनिर्देशन पत्र दाखल करताना त्यासोबत सर्व साधारण उमेदवारांना अनामत रक्कम रु. २,०००/- जमा करावी लागेल तसेच अनुसुचित जाती जमाती, इतर मागासवर्गीय गट, अल्पसंख्याक व विकलांग गट रक्कम रू. १०००/- जमा करावी. व १/६ मतापेक्षा कमी मत मिळाल्यास अनामत रक्कम जप्त होईल.

४) पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियम) अधिनियम- २०१४ अंतर्गत मधील नियम १४ (२) अंतर्गत उमेदवार अपात्र नसावा.

५) अनुसूचित जाती तथा अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता नामनिर्देशन पत्र सादर करताना त्यांच्या जाती, जमातीचे, सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्राची सत्य प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे अनिवार्य राहील.

६) नामनिर्देशन पत्र स्वतः उमेदवार किंवा त्यांचे सूचक वा अनुमोदक जमा व्यक्तिशः करणे बंधनकारक आहे.

७) नामनिर्देशन पत्रावर मतदार यादीमध्ये ज्याचे नाव समाविष्ट आहे. अशा मतदारांपैकी एक सूचक आणि अनुमोदक यांचे नाव आणि त्यांची सही असणे अनिवार्य आहे.

८) मतदानाला येताना पथविक्रेत्यांच्या मतदारांनी ओळखपत्र जसे मा. निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले फोटो असलेले ओळखपत्र, पॅनकार्ड, आधारकार्ड, ड्रायविंग लायसन्स तसेच बँकेने निर्गमित केलेले फोटो असलेले पासबुक सोबत आणावे लागेल अन्यथा मतदान प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

९) निवडणूक कार्यक्रमामध्ये तांत्रिक अडचणीमुळे फेरबदल करण्याचे अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे राहतील.

१०) निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अनुपस्थितीत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी निवडणुकीचे कामकाज पार पाडतील.

तरी पथ विक्रेत्यांच्या सर्व सदस्यांनी उपरोक्त कार्यक्रमाची कृपया नोंद घ्यावी व निवडणूक कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यास सहकार्य करावे.